CMYK

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' उपक्रम राबविणार - मंत्री आदिती तटकरे >> पान 2

सूर्यकन्या तापी जन्मोत्सव उत्साहात; १०८ मीटर साडी-चोळीचा ओटीभर आहेर अर्पण >> पान 3

साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाची केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली पाहणी >> पान 4

सुविचार
आयुष्यात आनंद शोधू नका, तो निर्माण करावा लागतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 06 ■ मंगळवार, दि. 21 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





नैसर्गिक आपत्तीवर आधारित चित्रपट 'एक होतं माळीण'चा थरारक ट्रेलर प्रदर्शित!

आतील पान

# CJP आंदोलनात राडा!

## ५ वरिष्ठ IPS अधिकाऱ्यांसह ११८ पोलीस जखमी, १५-२० वाहनांची तोडफोड; ७० हून अधिक ताब्यात!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : 'कॉकरोच जनता पार्टी'च्या 'चलो संसद' आंदोलनादरम्यान दिल्ली येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झालेल्या तुंबळ चकमकीत तब्बल ११८ हून अधिक पोलीस कर्मचारी तसेच अधिकारी गंभीर जखमी झाले आहेत. या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर दिल्ली पोलिसांनी ७० आंदोलकांना ताब्यात घेतले आहे. दंगल घडवणे, पोलिसांवर हल्ला आणि सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेअंतर्गत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंदोलकांनी जमावबंदीच्या आदेशाचे पालन न करता, पोलिसांचे बॅरिकेड्स तोडले आणि संसदेकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान काही आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली आणि सरकारी वाहनांचीही तोडफोड केली. या हिंसाचारात स्पेशल सीपी, जॉइंट सीपी, डिशनल सीपी, डीसीपी दर्जाच्या ५ हून अधिक वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांसह अनेक महिला पोलीस कर्मचारी असे ११८ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. याशिवाय सुमारे ६० आंदोलकही जखमी झाले आहेत.

१५ ते २० सरकारी वाहनांचे नुकसान -

हिंसाचारादरम्यान १५ ते २० सरकारी वाहनांचे तसेच इतर सरकारी मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी कडक कारवाई सुरू केली आहे. विविध तक्रारींच्या आधारे अनेक एफआयआर नोंदवण्यात आल्या आहेत. महत्वाचे म्हणजे, हा हिंसाचार उत्स्फूर्त होता की काही पूर्वआयोजित षड्यंत्र होते, या दृष्टीनेही पोलीस तपास करत आहेत.

महत्वाचे म्हणजे, कायदा आणि सुव्यवस्था राखणे आपली जबाबदारी आहे आणि हिंसाचार किंवा बेकायदेशीर कारवायांमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येकावर कठोर कारवाई केली जाईल, असे दिल्ली पोलिसांनी म्हटले आहे.



## इंग्रजांनाही लाजविणारे क्रूर, निष्ठूर सरकार; दिल्लीतील आंदोलन प्रश्नी रोहित पवार यांची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करीत होते. शांततेत आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवरही अशाच प्रकारे इंग्रजांकडून लाठीचार्ज केला जात होता. केंद्र सरकार इंग्रजांनाही लाजवेल असे क्रूर, निष्ठूर आहे. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्था आणि आंदोलकांवर लाठीचार्ज करणाऱ्या हुकूमशाही सरकारचा तीव्र निषेध करतो, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेश सरचिटणीस रोहित पवार यांनी केली आहे. >> पान २

## संसद भवन उखडून टाकू! नेपाळ बनवून टाकू!

### आंदोलनकर्त्याचा 'तो' व्हिडिओ व्हायरल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (उगझ) संसदेवरील मोर्चादरम्यान अत्यंत प्रक्षोभक घोषणाबाजी करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. सुरक्षा भिंती आणि बॅरिकेड्स तोडून संसदेच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांनी देशव्यापी शिक्षण व्यवस्थेतील गैरव्यवहाराविरोधात आक्रमक भूमिका घेताना थेट संसद भवन उखडून टाकले जाईल आणि याला नेपाळ बनवू अशा धमकीवजा घोषणा दिल्या.

आंदोलकांनी दिलेल्या याला नेपाळ बनवू या घोषणेमागे नेपाळमधील अलिकडच्या हिंसक राजकीय घडामोडींचा संदर्भ असल्याचे स्पष्ट होत आहे. नेपाळमध्ये तीव्र भ्रष्टाचारविरोधी आंदोलने, सोशल मीडियावरील कठोर बंदी, जुन्या संसद भवनाला आंदोलकांनी लावलेली आग आणि त्यानंतर पंतप्रधान बलेंद्र शाह यांच्या नेतृत्वाखाली >> पान २

## दिल्ली पोलिसांचे आंदोलकांना संयम बाळगण्याचे आवाहन!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कथित नीट परीक्षा गैरव्यवहाराप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टीच्या हजारो तरुणांनी मध्य दिल्लीत संसदेवर धडक मारण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांनी संसदेकडे जाण्यासाठी बहुस्तरीय बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न केला असता, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या कांड्या फोडल्या आणि लाठीचार्ज केला. संसदेच्या परिसरात अनेक ठिकाणी आंदोलक आणि सुरक्षा दल आमनेसामने आल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अधिकृत एक्स हॅंडलवरून निवेदन जारी करत सर्व सहभागींना शांतता व संयम राखण्याचे आवाहन केले आहे.

## मोदी हे तरुणांच्या विरोधातील पंतप्रधान- राहुल गांधी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राजधानीत आजपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी रस्त्यांवर आणि संसदेतही मोठा गदारोळ होण्याची शक्यता आहे. कॉकरोच जनता पार्टीने () पुकारलेल्या संसद मोर्चामुळे सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. च्या नियोजित चलो संसद (संसद मोर्चा) आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी नवी दिल्ली परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक केली असून, कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. परीक्षेतील कथित अनियमितता, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि बाधित विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागण्यांसाठी २० जूनपासून जंतरमंतर येथे आंदोलन करत आहे. आंदोलनाच्या ठिकाणीच रात्रीचा मुक्काम करण्याचे आवाहन चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केल्यानंतर रविवारीच जंतरमंतरवर मोठ्या संख्येने लोक जमा झाले आणि त्यांनी सोमवारी होणाऱ्या संसद मोर्चापूर्वी फलक झळकावत आणि घोषणा देत आपली उपस्थिती दर्शवली.




## पोलीस जखमी होत असताना काँग्रेस खासदार आनंदाने आंदोलनाला पाठिंबा देत आहेत!

### प्रीती गांधींचा रेणुका चौधरींवर जोरदार हल्लाबोल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नवी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट येथे कॉकरोच जनता पार्टीच्या संसदेवरील महामोर्चादरम्यान आंदोलकांनी केलेल्या दगडफेकीत दिल्ली पोलिसांचे उपनिरीक्षक जखमी झाले आहेत. या हिंसक घटनेनंतर आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भारतीय जनता पक्षाच्या () कार्यकर्त्या आणि नेत्या प्रीती गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या राज्यसभा खासदार रेणुका चौधरी यांच्या एका कथित वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेत जोरदार हल्लाबोल केला आहे. या हिंसक गोंधळात काँग्रेसची काय



भूमिका आहे, याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

प्रीती गांधी यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, ''दिल्ली पोलिसांच्या जवानांवर दगडफ`क करून त्यांना जखमी केले जात आहे आणि त्याच वेळी बडबड्या, नाटकबाज काँग्रेस खासदार रेणुका चौधरी डोळे फिरवत अत्यंत आनंदाने हवा में क्रांती की खुशबू आ रही है! अशी टिप्पणी करत आहेत. जंतर-मंतर आणि पार्लमेंट स्ट्रीटवर हा जो गोंधळ निर्माण झाला आहे, त्यामध्ये काँग्रेसच्या भूमिकेचीही सखोल चौकशी झाली पाहिजे!

नीट परीक्षा गैरव्यवहाराप्रकरणी सीजेपीने पुकारलेल्या या आंदोलनादरम्यान पार्लमेंट स्ट्रीटवर आंदोलकांकडून दगडफेक झाली, ज्यामध्ये दिल्ली पोलिसांचे उपनिरीक्षक आणि जवान जखमी झाले. भाजपने या हिंसाचाराचा तीव्र निषेध केला असून आंदोलन शांततेत न राहता हिंसक होण्यामागे राजकीय षड्यंत्र असल्याचा आरोप केला आहे.

## सोनम वांगचुक उपोषण सुरूच ठेवणार; शांततापूर्ण निदर्शकांवर बळाचा वापर होत असल्याने चिंता व्यक्त

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सोमवारी एक्स मीडियात पोस्ट करत उपोषण सुरुच ठेवणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी पोस्टमध्ये म्हटलं की ''शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या तरुणांशी ज्या क्रूरतेने वागले जात आहे, ते पाहता मी माझे उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत युवा नेत्यांना संसद भवनात खासदारांना भेटण्याची किंवा मला स्वतःला रुग्णालयात त्यांना भेटण्याची



परवानगी मिळत नाही, तोपर्यंत हे उपोषण सुरू राहील. आशा आहे की, त्याआधी सरकार हे शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी निश्चित करेल. मी सरकार आणि पोलीस दलाला आवाहन करतो की, आज किंवा उद्या विद्यार्थ्यांना त्यांची गाऱ्हाणी संसदेसमोर मांडण्याची परवानगी देऊन हा प्रश्न सोडवावा. मला खात्री आहे की, आज दाखवलेला संयम आणि सहनशीलता हे तरुण निदर्शक उद्याही कायम ठेवतील.''

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; सहा जणांचा मृत्यू

## सालोड हिरापूरच्या एकाच कुटुंबातील तिघांचा समावेश

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा । प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर विरुळ शिवारात सोमवारी भीषण अपघात होऊन सहा जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये वर्ध्यातील सालोड हिरापूर येथील एकाच कुटुंबातील तीन जणांचा समावेश असल्याची माहिती आहे. ही घटना घडल्यानंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कुटुंब पुण्यावरून आपल्या गावी परत येत असताना हा भीषण अपघात झाला. अपघातात कारमधील चार जणांचा, तर मालवाहू आयशर वाहनातील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, इथेनॉल घेऊन जाणारा एक टँकर महामार्गावर एका बाजूला उलटल्याने वाहतूक दुसऱ्या मार्गिकेवर टप्प्याटप्प्याने सुरू





होती. याच वेळी मागून भरधाव आलेल्या मालवाहू आयशर वाहनाने कारला जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच वर्धा पोलिस, महामार्ग पोलीस तसेच बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना मदत करण्याबरोबरच मृतदेह बाहेर काढण्याचे काम करण्यात आले. अपघातग्रस्त वाहने घटनास्थळावरून हटविण्यात आली असून वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच महामार्गावर उलटलेला इथेनॉल टँकर हटविण्याची प्रक्रियाही युद्धपातळीवर सुरू आहे.

या घटनेबाबत पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अपघाताच्या प्राथमिक कारणांची माहिती देत नागरिकांना समृद्धी महामार्गावर वाहन चालविताना अधिक दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

CMYK

## जंतरमंतर : देशातील तरुणाई अस्वस्थ

'नीट' पेपरफुटीने देशातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता आता राजकीय आंदोलनाचा मुद्दा बनत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना मिळालेली ही संधी आणि महाराष्ट्रातील बदलती राजकीय समीकरणे यामुळे या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नीट पेपरफुटीने देशातील विद्यार्थी अस्वस्थ झाले. आंदोलन सुरू झाले आहे. दिल्लीत जंतरमंतर येथे आंदोलन केले की सत्तापालट होतो, ही अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल विधेयकाची पार्श्र्वभूमी विरोधकांच्या स्मरणात आलेली दिसते. पुढच्या तीन वर्षांनी होणाऱ्या निवडणुकांकडे लक्ष देऊन आता फुटलेले पेपर आणि त्यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता ही विरोधकांना आंदोलनाची योग्य संधी वाटते आहे. खरे तर आप पक्षाशी पूर्वी संबंधित असलेल्या अभिजित दीपके यांनी या आंदोलनाला प्रारंभ केला. त्यांना सोशल मीडियावर उत्तम प्रतिसाद मिळाला. आंदोलनाला मिळणारा पाठिंबा प्रत्यक्ष गर्दीत परावर्तित होण्यासाठी त्यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना आवाज दिला. ते विविध कारणांमुळे प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना समवेत घेऊन आंदोलन करायचा हा निर्णय आता विरोधकांनी आपल्या उपयोगात आणायचा निर्णय घेतलेला दिसतो. राजकारण असेच असते. महाराष्ट्रातील विरोधी पक्ष आंदोलनाच्या विषयांच्या शोधात होतेच. आठ खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेकडे निघून गेल्यामुळे शिवसेना उबाठा अस्वस्थ आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार विलीनीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्यास राजी होती, असे काही संबंधित म्हणतात; पण अजित पवार गटाच्या ठाम विरोधामुळे निर्णय थांबला आहे. धर्मनिरपेक्षतेची साद घालत एनडीएकडे जाऊ नका, असे आवाहन इंडिया आघाडीने केले तर ज्येष्ठ नेते शरद पवार काय करतील? त्यांनी थांबायचे ठरवले तर खासदार साहेबांचे ऐकतील की भाजपच्या नेतृत्वातील एनडीएकडे सरकतील, अशी शंका घेतली जाते आहे. परिसीमन विधेयक लोकसभेत मांडले गेले तर शरद पवार यांच्या नेतृत्वातील ८ खासदार एनडीएच्या बाजूने मतदान करतील आणि मुद्द्यावर आधारित पाठिंबा यावर सध्याचा विषय संपेल, असेही म्हणतात. अर्थात, या जर-तरच्या गोष्टी आहेत. परिसीमन विधेयक मांडले गेले तर पुढे काय, हा प्रश्र्न उपस्थित होईल. सध्या फुटलेल्या पेपरने सरकारसमोर मोठाच प्रश्र्न निर्माण केला आहे आणि विरोधकांना आंदोलनाची संधी मिळाली आहे. उबाठाला मुद्दा मिळाला. पुढच्या तीन वर्षांनी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांची तयारी करायची हीच वेळ आहे, हे काँग्रेसलाही कळले आहे. सोनिया गांधी यांनी हस्तक्षेप करीत पक्षाला वांगचुक यांना पाठिंबा द्यायला लावला. इंदिरा गांधी यांनी वांगचुक यांच्या वडिलांचे उपोषण सोडवले होते, याचे पक्षकार्यकर्त्यांना स्मरण करून दिले. राहुल गांधी तरुणांना भेटून 'छात्रो की गुंज' हा कार्यक्रम राबवत आहेतच. देशातील तरुणाई अस्वस्थ झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. नीट हा मेडिकल प्रवेशाच्या परीक्षांचा पेपर फुटला आणि त्यामुळे बारावीत असलेले विद्यार्थी पूर्णतः अस्वस्थ झाले. वैद्यकीय प्रवेशासाठी जो प्रचंड अभ्यास करावा लागतो त्या ताणाचा विचारही करणे बाहेरच्यांना अशक्य, अशी परिस्थिती असते. त्यातच एकदा परीक्षा दिल्यानंतर तो पेपर फुटला हे कळणे आणि तो पुन्हा नव्याने द्यावा लागणे, हे कठीण आहे. ज्याला ते सोसावे लागते त्याचे दुःख त्यालाच माहिती. विद्यार्थी बावचळून जातात आणि आधीच पाल्याच्या भविष्याबद्दल चिंतेत असलेले पालक बावचळलेल्या मुलांना आधार कसा द्यायचा, हे न समजल्याने अधिकच अस्वस्थ होतात. या पेपर फुटीनंतर लगेचच नीटची पुनर्परीक्षा झाली. निकाल लागले आणि वैद्यकीय प्रवेश सुरूही झाले. तरीही देशातील अस्वस्थ तरुण अद्याप शांत झालेले नाहीत, असे चित्र आहे. खरे तर तरुण कधीच शांत होत नसतात. त्यांच्या अस्वस्थतेला चालना देणारे काही विधायक कार्यक्रम सामाजिक संस्थांना द्यायचे असतात. अशा पद्धतीचे कोणतेही कार्यक्रम सध्या तरुणाईसमोर नाहीत. जीव ओवाळून टाकावा अशा प्रकारचे ध्येय समोर नसेल तर तरुण पिढी अधिक अस्वस्थ होते. त्यामुळेच या अस्वस्थ पिढीने जे आंदोलन सुरू केले आहे त्याकडे सरकारने लक्ष द्यायला हवे. सर्वत्र या आंदोलनाचीच चर्चा आहे. महाराष्ट्रही या आंदोलनामुळे अस्वस्थ झाला आहे. मुळात या आंदोलनाला पाठिंबा किती जणांचा? यापेक्षा शांतता कशी निर्माण होईल, याची चर्चा व्हायला हवी. आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रात उमटताना दिसत आहेत. राजकीय भांडवल केले जाते आहे. खरेतर केंद्र आणि राज्यातील राजकीय परिस्थिती वेगळी आहे. राज्यात सरकारकडे बहुमत आहे, मोठे बहुमत. २०१९ नंतरच्या राजकीय खेळाला उत्तर देणारे बहुमत, असे त्याचे युतीचे नेते वर्णन करीत. तरीही राज्यातील अस्वस्थता कमी होत नाही. आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील हालचाली अस्वस्थतेचे कारण आहेत. केंद्रातील सरकारकडे बहुमत नाही. त्यामुळे परिसीमन विधेयकासारखी नवीन विधेयके आणताना त्यांना काही समीकरणे रचावी लागत आहेत. त्याचा अपरिहार्य परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर होतो आहे. केंद्रात नसले तरी इथे बहुमत आहे. तरीही अस्वस्थता आली, अशी परिस्थिती समाजात आहे. सरकारकडे बहुमत आहे. राज्यात तर इतके बहुमत आहे की, काहीही घडामोडी घडायची सुतराम शक्यता नाही. तरीही महाराष्ट्रात २०१९ पासून सुरू झालेल्या राजकीय चर्चा थांबायचे नावच घेत नाहीत. आता नव्याने राष्ट्रवादी विलीन होईल काय आणि त्याचा झाला तर काय फायदा होईल, या चर्चेतच महाराष्ट्राचे वर्तमान राजकारण गुंतले आहे. अजित पवार यांच्या विचारावर विश्र्वास ठेवून त्यांच्या समवेतचे चाळीसहून अधिक आमदार निवडून आले. आमदारांची संख्या मोठी. अचानक अपघाती आणि दुर्दैवी परिस्थितीत हे जग सोडून गेलेल्या नेत्याचे निधन त्या पक्षाला बळकट करू शकते. नेता गेल्याचे दुःख तर असते; पण सहानुभूतीमुळे नेत्याचे राजकीय वारसदार आपोआपच नेते होतात. राजीव गांधी यांच्याबाबतचा असा अनुभव भारताने यापूर्वी घेतला आहे. राजीव उमदे होते. अनुनभवी होते. तुलना योग्य नाही; मात्र राजीव त्यानंतर जसे राजकारणात उभे झाले तसे पार्थ यांच्याबाबत होईल काय? पार्थ यांनी त्यांच्या आई उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा आधार होण्याची गरज आहे. येत्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसने बळकट व्हावे आणि अजित पवारांना मानणाऱ्या वर्गाची मते स्वतःकडे कायम राखावीत, अशीच समर्थक नागरिकांची इच्छा असेल. अजित पवारांच्या मृत्यूनंतर येणारी त्यांची पहिली जयंती लवकरच येते आहे. ते निमित्त महत्त्वाचे मानत पक्षविस्ताराच्या योजना आखता येतील. राज्यात असे अस्थिर काही घडत असताना देशातील तरुणाई अस्वस्थ झालेली आहे. या अस्वस्थतेचे पडसाद वेगवेगळ्या स्तरावर येथेही उमटत आहेत. विरोधी पक्ष त्याचा लाभ घेत असताना मुळात सत्ता पक्ष नेमका काय करतो आहे आणि त्यासाठी तरुणांशी कशाप्रकारे संवाद साधला जाणार, यावरच पुढचे राजकारण अवलंबून असेल. जंतरमंतरवरील अण्णा हजारे यांचे आंदोलन आणि अभिजित दीपके यांचे आंदोलन हे संपूर्णतः वेगळे आहे. पुढे नक्की काय होते, ते येणाऱ्या काळात दिसेल.

# बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' उपक्रम राबविणार - मंत्री आदिती तटकरे

## बालकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि हक्कांवर विशेष भर



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक बालकापर्यंत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि सामाजिक सुरक्षेच्या योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात, तसेच बालकांमध्ये त्यांच्या हक्क व अधिकारांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने राज्यात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' ही संकल्पना राबविण्यात येणार असल्याची घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली.

राज्य बाल हक्क आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. मंत्रालयात झालेल्या बैठकीत बालकांच्या मानसिक आरोग्य, मूल्यसंस्कार आणि जीवनकौशल्य विकासासाठी तयार करण्यात आलेल्या 'मानस' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पालघर जिल्ह्यातील ५० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या 'मानस' प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कीटचे उद्घाटनही मंत्री तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, ५ सप्टेंबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत ग्रामीण व शहरी भागात विशेष अभियानाच्या स्वरूपात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा मानस आहे. या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्क, अधिकार आणि संरक्षणाच्या यंत्रणांची माहिती देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जाणार आहे.

यामध्ये गंभीर कुपोषण निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, एकात्मिक बाल संरक्षण योजना, पोषण, शिक्षण आणि बालसुरक्षा या विषयांवर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून प्रभावी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अभ्यासामध्ये बाल सुरक्षा समित्यांची स्थापना, बालस्नेही पंधरवडा, बाल संसद, शिक्षण व आदिवासी विकास विभागाच्या शिफारसी, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस) आणि पोषण ट्रॅकर अहवालाचा तुलनात्मक अभ्यास, तसेच बालकांमधील कुपोषण, कमी वजन आणि वाढत्या अतिरिक्त वजनाच्या समस्यांचे विश्लेषण यांचा समावेश असावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. आदिवासी भागातील सुमारे ५०० शासकीय आणि ५०० खासगी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या जवळपास पाच लाख विद्यार्थ्यांसाठी बालस्नेही ग्रामपंचायत राबविताना प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करावी. तसेच दुर्गम आणि आदिवासी भागातील बालकांच्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र उपक्रम आखण्याचा विचार करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

शहरी भागात बालस्नेही प्रभाग राबविताना नगरविकास विभागाशी समन्वय साधून लोकसंख्येच्या तुलनेत अंगणवाड्यांची संख्या अपुरी असल्यास नवीन बालवाडी केंद्रे सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच बालपंचायतींच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार (आरटीई), बालहक्क, '१०९८' चाईल्ड हेल्पलाईन आणि विविध संरक्षण यंत्रणांची माहिती प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून बालकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बालस्नेही ग्रामपंचायतींमध्ये वर्षभरात नोंदविण्यात आलेल्या समस्या, त्यावरील उपाययोजना आणि झालेल्या सुधारणांचा नियमित आढावा घेऊन त्याचा सविस्तर अहवाल पुढील ग्रामसभेत सादर करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्याची सूचनाही त्यांनी केली. राज्यात ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध सकारात्मक उपाययोजना राबवित आहे. 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' हे उपक्रम बालकांच्या सुरक्षित, सुदृढ आणि सक्षम भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरतील, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला. बैठकीस सचिव डॉ. अनुपकुमार यादव (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास आयुक्त वर्षा लड्ढा, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, उपसचिव आनंद भोंडवे, उपायुक्त वर्षा पवार, राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक, सचिव वंदना जैन, मुंबई जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार, तसेच शिक्षण, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभागाचे अधिकारी आणि युनिसेफचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पान १ वरून...

## इंग्रजांनाही लाजविणारे क्रूर

संसदेवर निघालेला विराट मोर्चा सर्वार्थाने चिरडण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. मात्र, लोकशाहीमध्ये रस्त्यावर उतरलेला सर्वसामान्य माणूस सर्वात शक्तिशाली असतो, हे आज सरकारच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. सोनम वांगचूग यांनी २० दिवस अन्नत्याग केले तरीही शासनाने या आंदोलनाची दखल घेतली नाही. उलट वांगचूक यांना हुकुम शाही पद्धतीने उचलण्यात आले. आपली चूक सरकार मान्य करत नाही. उलट लोकशाही पद्धतीने आंदोलन देखील करून दिले जात नाही. सरकारने आता तरी शहाणे व्हावे. अकार्यक्षम शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा, अन्यथा हे आंदोलनच त्यांच्या शेवटाची सुरुवात असेल. सरकार असेच वागत राहिले तर केवळ तांत्रिकदृष्ट्या सत्तेवर असलेल्या या सरकारला तरुण सत्तेतून खाली खेचल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

अश्रुधूरांचे नळकांडे फोडून तरुणाईचा आवाज दाबला जाणार नाही

अश्रुधूरांचे नळकांडे फोडून देशातील तरुणाईचा आवाज दाबला जाणार नाही, तो अजून बुलंद होईल. धूर आंदोलकांवर सोडला तरी पाणी मात्र हुकूमशाही वृत्तीच्या निष्ठूर सरकारच्या डोळ्यात आल्याशिवाय राहणार नाही. दडपशाहीच्या माध्यम ातून तरुणाईचा आवाज दाबू पाहणाऱ्या केंद्र सरकारचा मी जाहीर निषेध करतो, असेही पवार यांनी म्हटले आहे.

'देशभरातील कोट्यवधी तरुण रस्त्यावर उतरला असताना आणि जगभर सरकारची नाचक्की होत असतानाही सरकार निष्क्रिय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना कवटाळून का बसलंय ? सरकारचे असे कोणते गुपीत त्यांच्या हातात आहे, ज्याला घाबरून सरकार त्यांना वाचवतंय ?, न्याय आणि हक्क म ागणाऱ्या आंदोलकांना सरकारचे पोलिस असे बदडून काढता आहेत. हे सरकार आहे की, रजाकार ? असा सवालही पवार यांनी उपस्थितीत केला आहे.

तर मुंबईतही आंदोलनाचा भडका

तरुणाईला गृहीत धरले तर काय होते, याचा अंदाज दिल्लीतील हुकूमशाहीला आलाच असेल. कोणाचाही नाद करा, पण तरुणाईचा नाद करायचा नाही. महाराष्ट्र सरकारने देखील हे लक्षात घ्यावे. दडपशाहीने आणि कुटनीतीने एम पीएससीच्या ऑनलाइन परीक्षा लादण्याचा प्रयत्न केला, तर याद राखाष्ठ मुंबईत या पेक्षाही मोठे चित्र दिसेल, असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

## संसद भवन उखडून टाकू! नेपाळ बनवून टाकू!

नवीन सरकार सत्तेवर येणे, असा भीषण राजकीय प्रवास पार पडला आहे.

जंतर-मंतरवर जमलेल्या आंदोलकांनी थेट नेपाळच्या या हिंसक क्रांतीचे आणि अराजकतेचे दाखले देत भारतातील सत्ताधारी व्यवस्था आणि संसदेला आव्हान देण्याचा प्रयत्न केल्याने आता हे आंदोलन नेमकं कोण चालवतयं असा प्रश्र्न निर्माण झाला आहो. संसदेचे सत्र सुरू असतानाच आंदोलकांनी नियोजित मार्ग सोडून सुरक्षा कवच तोडण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांनी दिल्ली पोलिसांनी उभारलेले मुख्य बॅरिकेड्स तोडून थेट संसद भवनाच्या उच्च सुरक्षा क्षेत्रात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून दिल्ली पोलीस आणि निमलष्करी जवानांकडून आंदोलकांना थांबवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# दिल्ली पेटली, विद्यार्थी रस्त्यावर; सरकार अजूनही शांत?

## विद्यार्थ्यांचा आक्रोश, दिल्लीतील आंदोलन आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची खरी वेळ

देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. पण जेव्हा स्पर्धा परीक्षांचे प्रश्नपत्रिकाच पैशाच्या जोरावर बाजारात विकले जातात, तेव्हा केवळ एखादी परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्यावरील आशाही हादरते. नीट पेपरफ ुटी प्रकरणाने देशभरात निर्माण झालेला संताप हा केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहिलेला नाही. तर तो आज संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा राष्ट्रीय विषय बनला आहे. हजारो विद्यार्थी दिल्लीतील जंतर-मंतरवर उतरले आहेत. त्यांच्या मागण्या राजकीय नसून, उत्तरदायित्व, न्याय आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, एवढ्याच आहेत.







या आंदोलनाला नवे स्वरूप मिळाले ते प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. २८ जून पासून त्यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेल्यानंतर न्यायालयाच्या निर्दे शांनुसार त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र आंदोलन थांबले नाही. उलट त्याची नैतिक ताकद अधिक वाढली. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली असून, २० जुलै रोजी संसदेकडे "चलो संसद" मोर्चाची घोषणा कायम असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. लोकशाहीत आंदोलन हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. शासनाला विरोध करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट शासनाचे लक्ष जनतेच्या प्रश्नांकडे वेधण्याचा तो लोकशाही मार्ग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे ही लोकशाहीची खरी कसोटी असते.

आज देशातील लाखो विद्यार्थी एका प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत. जर मेहनत, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता यांना प्रश्नपत्रिका माफियांसमोर पराभूत व्हावे लागणार असेल, तर अभ्यास करण्याचा अर्थ काय? हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. कारण एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ त्याचे वैयक्तिक नुकसान नसते, तर त्या कुटुंबाच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. या आंदोलनाला विविध विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. राहुल गांधी, उद्धव ठाकरे, चंद्रशेखर आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने संवाद साधावा, अशी भूमिका घेतली आहे. मात्र कोणत्याही आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्या आंदोलनातील मूळ प्रश्न गौण होत नाही. उलट शासनाने त्या प्रश्नाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होते.

सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असतानाही त्यांनी आंदोलन मागे घेतले नाही. रुग्णालयातूनही त्यांनी २० जुलैच्या संसद मोर्चासाठी नागरिकांना शांततापूर्ण सहभागाचे आवाहन केले आहे. त्यांचे हे आवाहन अनेकांसाठी नैतिक प्रेरणेचे प्रतीक ठरले आहे. तथापि, या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. कोणत्याही तपासाआधी दोषारोप करणे योग्य नाही. दोषींवर कठोर कारवाई व्हावी, ही विद्यार्थ्यांची अपेक्षा रास्त आहे. पण ती कारवाई कायद्याच्या चौकटीत, निष्पक्ष तपासानंतरच व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. सरकारवर उत्तरदायित्व आहे, तसेच तपास यंत्रणांवर निष्पक्षतेची जबाबदारीही तितकीच आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची स्पर्धा राहिली नाही, तर पैशांची स्पर्धा झाली, अशी भावना समाजात निर्माण झाली तर देशाची गुणवत्ता आधारित व्यवस्था कोलमडू शकते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी आणि न्यायाधीश हेच विद्यार्थी आहेत. त्यांचा आत्मविश्वास ढासळणे म्हणजे देशाच्या भविष्याची पायाभरणी कमकुवत होणे होय. सरकारने या आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाप्रमाणे न पाहता, राष्ट्रीय शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. दोषींना कठोर शिक्षा, परीक्षा प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पेपरफुटी रोखण्यासाठी स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणा, तसेच विद्यार्थ्यांशी थेट संवाद, ही चार पावले तातडीने उचलली गेली तर परिस्थिती बदलू शकते.

लोकशाहीत सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते, तर विरोध ऐकून त्यावर उत्तर देण्यात असते. संसद हे जनतेच्या प्रश्नांचे मंदिर मानले जाते. त्यामुळे २० जुलैचा प्रस्तावित संसद मोर्चा केवळ आंदोलन नसून, शासन आणि विद्यार्थ्यांमधील विश्वासाची परीक्षा ठरणार आहे. आज देशातील प्रत्येक पालक, प्रत्येक विद्यार्थी आणि प्रत्येक जागरूक नागरिक एका उत्तराची वाट पाहत आहे. या देशात प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित आहे का? या प्रश्नाचे उत्तर घोषणांमध्ये नाही, तर कृतीत दडलेले आहे. कारण प्रश्नपत्रिका फुटली की फक्त एक परीक्षा रद्द होत नाही, तर न्याय, समान संधी आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वावरही प्रश्नचिन्ह उभे राहते. देशाला आंदोलन नको आहे, देशाला विश्वास हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको आहे, त्यांना न्याय हवा आहे आणि शासनानेही हे लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्राची खरी उभारणी संसदेच्या भिंतींवर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वासावर उभी असते.



**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

## अंगणवाडीच्या पोषण आहाराच्या पाकिटात मृत पक्षी आढळल्याचा आरोप; चौकशीची मागणी





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक। प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील देवगाव येथील इंदिरानगर अंगणवाडी केंद्रातून वितरित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पोषण आहाराच्या बंद पाकिटात कुजलेल्या अवस्थेतील मृत पक्षी आढळल्याचा आरोप समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवगाव बिट क्रमांक २ अंतर्गत इंदिरानगर अंगणवाडी केंद्रातून लाभार्थी बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी एका कुटुंबाला मिळालेल्या बंद पाकिटात कुजलेल्या अवस्थेतील मृत पक्षी आढळल्याचा दावा संबंधितांनी केला आहे. यानंतर या प्रकाराची माहिती स्थानिक प्रशासनाला देण्यात आली.

घटनेची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांनी या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी पोषण आहाराच्या उत्पादन व वितरण प्रक्रियेचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित प्रशासनाकडून अधिकृत तपास सुरू असून, तपासानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकासासाठी २५ कोटी



**अमरावती । प्रतिनिधी :** अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकासासाठी २५ कोटी रूपयांच्या कामांमध्ये श्री संत गाडगे महाराज स्मृती केंद्र कल्चरल व्हॅल्यू एज्युकेशन सेंटरचे उर्वरित बांधकाम, श्री संत गाडगे महाराज स्मृति भवन परिसरामध्ये शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटर तळमजल्याचे बांधकाम करणे, यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, कीर्तनासाठी सभागृह, समाधीचा जीर्णोद्धार व सौंदर्यीकरण, ध्यान केंद्रासाठी इमारत, कुंताबाई समाधीचे सौंदर्यीकरण, अंतर्गत रस्ते,पार्किंग, बगीचे,फर्निचर व इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

चक्रधर स्वामी मंदिर परिसरासाठी ४१.७५ कोटींची कामे

चक्रधर स्वामी मंदिर परिसरासाठी ४१.७५ कोटींच्या कामांमध्ये काटोल येथील भगवान श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसर विकास आराखड्यात बहुउद्देशीय सभागृह, आधुनिक सार्वजनिक प्रसाधनगृह, भव्य प्रवेशद्वार, संरक्षक भिंत, वाहनतळ, बगीचा, कमानी पूल, पाथवे आणि इतर पर्यटन सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या विकासामुळे महानुभाव पंथाच्या या ऐतिहासिक तीर्थक्षेत्रात भाविकांसाठी सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक सुविधा निर्माण होणार असून धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे.

बैठकीला वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, प्रधान सचिव डॉ के. एच. गोविंदराज, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नागपूर, परभणी व अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# सूर्यकन्या तापी जन्मोत्सव उत्साहात; १०८ मीटर साडी-चोळीचा ओटीभर आहेर अर्पण







दैनिक आपला विदर्भ

**जळगाव । प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील निमगव्हाण येथील दादाजी धुनिवाले दरबारात सूर्यकन्या तापी जन्मोत्सव रविवारी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. १९४७ पासून अखंड सुरू असलेल्या या परंपरेनुसार तापी नदीची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर १०८ मीटर साडी-चोळीचा ओटीभर आहेर तापी मातेला अर्पण करण्यात आला.

जन्मोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्यात महाराष्ट्रासह गुजरात आणि मध्य प्रदेशातील हजारो भाविकांनी सहभाग घेतला. पूजा-अर्चना, पारंपरिक धार्मिक विधी आणि भक्तिगीतांच्या वातावरणात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

धार्मिक कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पंचक्रोशीतील तसेच परराज्यातील भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

यावेळी दादाजी धुनिवाले दरबार मंदिराचे ट्रस्टी भगवान पाटील यांनी जन्मोत्सवाच्या परंपरेची माहिती देत तापी मातेबद्दलची श्रद्धा आणि या उत्सवाचे धार्मिक महत्त्व अधोरेखित केले.

## इंजिनिअरच निघाला सायबर भामटा! युनिटी मोटर्सला २.३६ कोटींचा गंडा; गुजरातमधून पाच जण जेरबंद

दैनिक आपला विदर्भ



**कोल्हापूर । प्रतिनिधी :** गोकुळ शिरगाव येथील नामांकित युनिटी मोटर्स कंपनीची तब्बल २ कोटी ३६ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आंतरराज्य सायबर टोळीचा कोल्हापूर सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी गुजरातमधील अहमदाबाद येथून पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, विशेष म्हणजे आरोपी हे २० ते २५ वयोगटातील उच्चशिक्षित तरुण आहेत. त्यामध्ये एका ऑटोमोबाईल इंजिनिअरचाही समावेश असल्याने या प्रकरणाची अधिकच चर्चा रंगली आहे.

तपासादरम्यान आरोपींनी आपल्या तांत्रिक ज्ञानाचा गैरवापर करून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने कंपनीची ऑनलाइन फसवणूक केल्याचे समोर आले आहे. आर्थिक व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करून मोठी रक्कम परस्पर वळविण्याचा कट या टोळीने रचला होता. तक्रार दाखल होताच कोल्हापूर सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास, डिजिटल पुरावे आणि विविध राज्यांतील समन्वयाच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचत ही मोठी कारवाई केली.

या प्रकरणाचा छडा लावत गुजरातमधील अहमदाबाद येथे धाड टाकून पाचही आरोपींना अटक करण्यात आली. सायबर गुन्ह्यांमध्ये सुशिक्षित युवकांचा वाढता सहभाग ही चिंतेची बाब असल्याचे या कारवाईतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. या कारवाईची माहिती पोलीस अधीक्षक बी. निलोत्पल यांनी पत्रकार परिषदेत दिली असून, या गुन्ह्याचा अधिक तपास कोल्हापूर सायबर पोलीस करत आहेत.

## सोनम डोंगरे मृत्यू प्रकरण : आरोग्य व्यवस्था निर्दोष? चौकशी अहवालानंतर महापौरांचे स्पष्टीकरण



दैनिक आपला विदर्भ



**नवी मुंबई । प्रतिनिधी :** ऐरोली येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारादरम्यान गर्भवती सोनम डोंगरे यांच्या झालेल्या मृत्यूनंतर महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. मात्र, या प्रकरणाच्या चौकशी अहवालानंतर महापौर सुजाता पाटील यांनी महापालिकेची आरोग्य यंत्रणा या घटनेसाठी जबाबदार नसल्याचे स्पष्ट केले.

महापौरांनी सांगितले की, चौकशी समितीच्या अहवालात आरोग्य व्यवस्थेतील निष्काळजीपणा आढळून आलेला नाही. त्यामुळे वस्तुस्थिती समोर आल्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागावर करण्यात आलेले आरोप योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद नवी मुंबई महापालिकेच्या महासभेतही उमटले. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये यावरून जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले. विरोधकांनी या घटनेची सखोल चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली, तर सत्ताधारी पक्षाने चौकशी अहवालाचा दाखला देत महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेची बाजू मांडली.

सोनम डोंगरे मृत्यू प्रकरणामुळे शहरातील आरोग्य सेवांबाबत सुरू झालेली चर्चा अद्याप कायम असून, चौकशी अहवालानंतरही या प्रकरणावर विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत.

## पोलिस दलात खळबळ; भारतातील बड्या आयपीएस अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू

**त्रिपुरा/वृत्तसंस्था :** भारतीय पोलिस दलात खळबळ माजवणारा प्रकार उघडकील आला आहे. भारतातील बड्या आयपीएस अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. त्रिपुराचे डीजीपी अनुराग धनखर पोलीस मुख्यालयात मृतावस्थेत आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. १३,००० कोटींचा पीएनबी घोटाळा आणि नीरव मोदी प्रकरणासह अनेक हाय-प्रोफाईल प्रकरणांच्या तपासाचे नेतृत्व अनुराग धनखर यांनी केले होते. त्रिपुराचे पोलीस महासंचालक (डीजीपी) अनुराग धनखर यांचा मृतदेह आगरतळा पोलीस मुख्यालयात सापडला आहे. आगरतळा येथील जीबी रुग्णालयात त्यांचा मृतदेह नेण्यात आला आहे. मृत्यूचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. अनुराग धनकर यांचा मृतदेह त्यांच्याच केबीनमध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. तर, ते बेशुद्ध अवस्थेत बाथरुममध्ये आढळल्याचे काही जणांकडून सांगण्यात आले.



घटनेची माहिती मिळताच, पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्याला तात्काळ आगरतळा येथील गोविंद बल्लभ पंत (जीबीपी) रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. फिसचा परिसर सील करण्यात आला आहे. अधित तपास सुरू आहे. पोलिसांनी अद्याप या प्रकरणी अधिक माहिती दिलेली नाही. पोलीस मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत. सुरक्षा व्यवस्थते वाढ केली आहे. पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्रिपुराचे मुख्यमंत्री प्रा. (डॉ.) माणिक साहा यांनी तात्काळ पोलीस मुख्यालयात धाव घेतली. मुख्य सचिव जे. के. सिन्हा, गृह विभागाचे अनेक वरिष्ठ अधिकारी देखील घटनास्थळी दाखल झाले.

अनुराग धनखर हे १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. अनुराग धनखर यांनी २०२५ मध्ये त्रिपुराचे पोलीस महासंचालक (डीजीपी) म्हणून पदभार स्वीकारला. यापूर्वी त्यांनी राज्यात गुप्तचर आणि कायदा व सुव्यवस्था यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली होती. त्रिपुरामध्ये जवळपास १६ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांनी सीमा सुरक्षा, गुप्तचर आणि अंतर्गत सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या बाबी हाताळत विविध पदांवर काम केले. धनखर यांनी नीरव मोदी प्रकरणातील सीबीआय तपासाचे नेतृत्व केले होते. तसेच, १९८४ च्या शीख हत्याकांडाचा तपास करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाचे (एसआयटी) नेतृत्वही त्यांनी केले होते. यापूर्वी त्यांनी राज्यात गुप्तचर आणि कायदा व सुव्यवस्था यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली होती. त्रिपुरातील आपल्या जवळपास १६ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी सीमा सुरक्षा, गुप्तचर आणि अंतर्गत सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या बाबी हाताळत विविध पदांवर काम केले. अनुराग धनखर हे मुळचे उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यातील बिहारपूर गावचे रहिवासी आहेत.

### नैसर्गिक आपत्तीवर आधारित चित्रपट ‘एक होतं माळीण’चा थरारक ट्रेलर प्रदर्शित!

हैदराबाद : 'माळीण' गावावर ३० जुलै २०१४ रोजी अतिवृष्टीमुळं भीषण भूस्खलनाचे संकट कोसळले. अवघ्या काही क्षणांत संपूर्ण गाव मातीखाली गाडले गेले आणि शेकडो लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. निसर्गाच्या रौद्र रूपाची आणि मानवी वेदनेची ही अत्यंत हृदयद्रावक घटना आजही अनेकांच्या स्मरणात जिवंत आहे. अतिवृष्टी आणि भूस्खलनाच्या भीषण तडाख्यात उद्ध्वस्त झालेल्या माळीण गावाची हृदयद्रावक कहाणी आता रुपेरी पडद्यावर उलगडणार आहे ज्याचं नाव आहे 'एक होतं माळीण.'

# नाशकात दुहेरी हत्याकांड! पत्नी अन् ७ वर्षांच्या चिमुरड्याचा गळा चिरून पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक । प्रतिनिधी :** येथील जेलरोड परिसरातील वसंत विहारजवळील महारुद्र कॉलनी (अरिंगळे चाळ) याठिकाणी आज सोमवारी दुपारी घडलेल्या दुहेरी हत्येच्या घटनेनं संपूर्ण शहर हादरलं आहे. पतीने आपल्या पत्नी आणि अवघ्या ७ वर्षांच्या मुलाची धारदार शस्त्राने सपासप वार करत त्यांची हत्या केली. त्यानंतर विषारी औषध प्राशन करत आत्महत्येचाही प्रयत्न केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनी किरण हजारे (वय ४३) आणि त्यांचा मुलगा श्रेयश किरण हजारे (वय ७) यांचा जागीच मृत्यू झाला. आरोपी किरण एकनाथ हजारे (वय ५४) याने हत्येनंतर विषारी औषध सेवन केलं. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला तातडीने बिटको रुग्णालयात दाखल केलं. त्यानंतर त्याला पुढील उपचारांसाठी शासकीय जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आलं आहे. सध्या त्याची प्रकृती स्थिर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या दुहेरी हत्येचं नेमकं कारण काय? याचा तपास नाशिकरोड पोलीस करत आहेत.

किरण हजारे आणि अश्विनी हजारे यांचा २०१७ मध्ये विवाह झाला होता. दोघांचंही हे दुसरे लग्न होतं. किरण हजारे हा रुग्णालयांना ऑक्सिजन पुरवठा करण्यासह सोलर प्लांट उभारणीसाठी मार्केटिंगचं काम करत होता. गेल्या ७ महिन्यांपासून हे कुटुंब नाशिकरोड येथील वसंत विहार परिसरातील अरिंगळे चाळीत भाड्याच्या घरात राहत होतं.

रविवारी रात्री हे कुटुंब सासरवाडीत जेवणासाठी गेलं होतं. तेथून आनंदानं घरी परतल्यानंतर सोमवारी अचानक नेमकं काय घडलं? याचे गूढ कायम आहे. सकाळी घराचा दरवाजा न उघडल्यानं संशय निर्माण झाला आणि हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच नाशिकरोड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना अश्विनी हजारे आणि त्यांचा ७ वर्षीय मुलगा श्रेयश यांचे मृतदेह आढळून आले. प्राथमिक तपासात अश्विनी हजारे यांच्या डोक्याच्या मागील बाजूस धारदार शस्त्रानं वार करण्यात आल्याचं, तर श्रेयशच्या गळ्यावर चाकूने वार करण्यात आल्याचे निष्पन्न झालं. अतिरक्तस्रावामुळे दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहेत.

हत्येमागील कारण अस्पष्ट; सर्व बाजूंनी तपास सुरू : हजारे दाम्पत्याच्या विवाहाला सुमारे ९ वर्षे झाली होती. व्यावसायिकदृष्ट्या स्थिर असलेला किरण हजारे अचानक इतकं टोकाचं पाऊल का उचललं? याचा पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. आर्थिक अडचण, कौटुंबिक वाद किंवा अन्य कोणतं कारण या घटनेमागे आहे का? याची चौकशी सुरू आहे. विषारी औषध प्राशन केलेला आरोपी किरण हजारे सध्या रुग्णालयात उपचाराधीन असून, तो बोलण्याच्या स्थितीत आल्यानंतर त्याची सखोल चौकशी करण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांनी दिली.

# साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाची केंद्रीय आरोग्य व कुंटुब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** साखरखेर्डा येथे बांधण्यात आलेल्या नवीन ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची पाहणी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. लवकरच ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होऊन ते जनतेच्या सेवेत कार्यान्वित होईल, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील जनतेला सहज उत्तम आरोग्य सेवा मिळावी या दृष्टिकोनातून केंद्र व राज्य सरकारच्यावतीने ग्रामीण भागात ग्रामीण



रुग्णालय बांधण्यात येत आहे बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथेही ३० खांटाचे सुसज्ज असे ग्रामीण रुग्णालय बांधण्यात आले आहे.१९ जुलै रोजी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे साखरखेर्डा दौऱ्यावर असताना त्यांनी साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली तेथील कामाची पाहणी केली यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रय बिराजदार जिल्हा आरोग्य अधिकारी श्री मंडले उपास्थित होते.

साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाच्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचारी पद भरती ला शासनाने मान्यता दिली आहे. लवकर हे पदे भरण्यात येणार असून ग्रामिण रुग्णालयात जनतेच्या सेवासाठी लोकार्पित करण्यात येणार आहे,अशी माहिती केंद्रीय आयुष आरोग्य प्रमुख कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पाहणीनंतर सांगितले.

काही तांत्रिक कारणामुळे ग्रामीण रुग्णालयाचे काम रखडले होते त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आल्या आहे. इमारत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून येत्या महिन्याभरात हे ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होईल, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रय बिराजदार यांनी दिली आहे.

## भारतात पहिल्यांदाच डेंग्यू प्रतिबंधक लसीला मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतात पहिल्यांदाच डेंग्यू प्रतिबंधक लसीला मंजुरी मिळाली आहे. ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने (डीसीजीआय) ताकेडा बायोफार्मास्युटिकल्स इंडियाच्या 'क्यूडेंगा' लसीला बाजारात वापरण्याची परवानगी दिली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, ही लस ४ ते ६० वर्षांपर्यंतच्या लोकांना दिली जाऊ शकते. ही लस घेण्यापूर्वी, व्यक्तीला यापूर्वी कधी डेंग्यूची लागण झाली होती की नाही, याची तपासणी करण्याची गरज भासणार नाही.

भारतात मिळालेली मंजुरी 'ताकेडा'च्या जागतिक क्लिनिकल डेव्हलपमेंट प्रोग्रामवर आधारित आहे. याअंतर्गत फेज-ख, फेज-खख आणि फेज-खखख चे एकूण १९ क्लिनिकल ट्रायल्स करण्यात आले, ज्यात २८ हजारांहून अधिक लोकांनी भाग घेतला. 'क्यूडेंगा'चे दोन डोस दिले जातात. प्रत्येक डोस ०.५ मिलिलिटरचा असतो आणि त्वचेखाली इंजेक्शनद्वारे दिला जातो. दोन्ही डोसमध्ये तीन महिन्यांचे अंतर ठेवले जाते.

देशातच होईल लसीचे उत्पादन

'क्यूडेंगा' ही खरे तर जपानी कंपनी 'ताकेडा'ने शोधलेली लस आहे; पण आपल्यासाठी सर्वात मोठी दिलासादायक बाब म्हणजे, 'मेक इन इंडिया'अंतर्गत या लसीचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन देशातच होईल. यासाठी 'ताकेडा'ने हैदराबादमधील प्रसिद्ध फार्मा कंपनी 'बायोलॉजिकल ई'सोबत करार केला आहे. भारतातच उत्पादन होत असल्यामुळे याचा पुरवठा जलद आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय होईल. याची निश्र्चित किंमत अद्याप जाहीर व्हायची आहे; पण ही आपल्याच देशात तयार होईल, त्यामुळे सामान्य लोकांच्या खिशावर जास्त भार पडणार नाही, अशी अपेक्षा आहे. बाजारात लाँच झाल्यानंतर, खबरदारी म्हणून सुरुवातीच्या ६ महिन्यांपर्यंत लोकांवर होणाऱ्या तिच्या परिणामावर पूर्णपणे लक्ष ठेवले जाईल.

भारत जगातील डेंग्यूने सर्वाधिक प्रभावित देशांपैकी एक

'ताकेडा'च्या मते, भारत जगातील डेंग्यूने सर्वाधिक प्रभावित देशांपैकी एक आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये डेंग्यू विषाणूचे चारही सेरोटाईप एकाचवेळी पसरत आहेत. कंपनीचे वैद्यकीय व्यवहारप्रमुख गोह चू बेंग यांनी सांगितले की, 'क्यूडेंगा'ला चारही सेरोटाईपपासून संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ही मंजुरी भारतात डेंग्यू प्रतिबंधाच्या रणनीतीला बळकटी देईल. यासोबतच मच्छर नियंत्रण, पाळत ठेवणे, जनजागृती आणि इतर सार्वजनिक आरोग्य उपाययोजनादेखील आवश्यक राहतील.

कंपनीने असेही म्हटले आहे की, जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) डेंग्यू प्रभावित क्षेत्रांमध्ये 'क्यूडेंगा'च्या वापराची शिफारस करते. 'डब्ल्यूएचओ'चे समर्थन आहे की, जास्त संसर्ग असलेल्या भागांमध्ये याला सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमात प्री-व्हॅक्सिनेशन स्क्रीनिंगशिवाय समाविष्ट केले जाऊ शकते.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीचा बिगुल; २३ ऑगस्टला मतदान, २४ ऑगस्टला मतमोजणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** दीर्घकाळापासून प्रतीक्षेत असलेल्या बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (जिल्हा बँक) संचालक मंडळाच्या २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक कार्यक्रमास मंजुरी दिली असून, २३ ऑगस्ट रोजी मतदान तर २४ ऑगस्ट रोजी मतमोजणी होणार आहे.

विभागीय सहनिबंधक तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी गौतम वर्धन यांनी १६ जुलै रोजी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध केला. त्यानुसार २० जुलै रोजी निवडणुकीची अधिसूचना जारी होणार असून, त्याच दिवसापासून २४ जुलैपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येतील.

उमेदवारी अर्जांची छाननी २५ जुलै रोजी होईल, तर वैध उमेदवारांची यादी २७ जुलैला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २७ जुलै ते १४ ऑगस्टपर्यंत राहील. १४ ऑगस्ट रोजी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करून निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल.

आवश्यकता भासल्यास २३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. २४ ऑगस्ट रोजी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निकाल जाहीर केला जाईल, तर संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.



जिल्हा बँकेच्या संचालक मंडळासाठी तालुकानिहाय १३ मतदारसंघांतून प्रत्येकी एक संचालक निवडला जाणार आहे. याशिवाय महिला प्रतिनिधींसाठी दोन जागा, तसेच अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती अथवा इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागलेल्या या निवडणुकीमुळे इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना वेग आला असून, राजकीय आणि सहकारी क्षेत्रात निवडणुकीची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

## संजय राऊत देशातील तरुणांना भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत; त्यांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत – बन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. देशातील तरुण वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत असून, तरुणांना भडकवून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, असा दावा त्यांनी केला.

मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बन म्हणाले की, दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी न्यायालयाच्या निर्देशांनुसार कारवाई केली आहे. स्टार्टअप, मेक इन इंडिया आणि इतर उपक्रम ांमध्ये देशातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने त्यांचा सरकारवरील विश्वास कायम असल्याचे त्यांनी सांगितले. आदित्य ठाकरे यांच्या आंदोलनावर टीका करताना त्यांनी भगव्या विचारांपासून दूर जाण्याचा आरोप केला. हिंदुत्वाच्या भूमिकेवर ठाम राहूनच नेतृत्व करता येते, असेही त्यांनी म्हटले. तसेच उद्धव ठाकरे यांनी रामाच्या नावाने आंदोलन करण्याऐवजी आपल्या पक्षाच्या भवितव्याचा विचार करावा, असा

संजय राऊत यांच्यावर टीका करताना नवनाथ बन यांनी ईडी आणि इतर तपास यंत्रणांबाबत केलेल्या वक्तव्यांचा उल्लेख केला. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे तपास यंत्रणा कारवाई करत असल्याचे सांगत त्यांनी ईडीवर टीका करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. पत्राचाळ प्रकरणाचाही त्यांनी उल्लेख केला.

याशिवाय, निवडणूक आयोग आणि केंद्रीय संस्थांबाबत विरोधकांची भूमिका परिस्थितीनुसार बदलत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निकाल अनुकूल आला तर संस्थांचे कौतुक आणि प्रतिकूल आला तर त्यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, अशी टीका त्यांनी केली.

दरम्यान, भाजपच्या या टीकेला ठाकरे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# देशी दारू जप्त; आता मूळ पुरवठादारावर कारवाई होणार का?

## डोणगाव पोलिसांच्या धडाक्यानंतर दारूबंदी विभागावरही प्रश्नचिन्ह!

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी :** डोणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत शाहापूर येथे अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईत ९० मिली क्षमतेच्या तब्बल १२५ देशी भिंगरीच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करत कारवाई केली. मात्र या कारवाईनंतर अनेक गंभीर प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत.

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, या १२५ देशी भिंगरीच्या बाटल्या नेमक्या कुठून आल्या? संबंधित व्यक्तीपर्यंत हा माल पोहोचवणारा पुरवठादार कोण? हा माल कोणत्या अधिकृत दारू दुकानातून बाहेर पडला? या साखळीचा शोध घेऊन मूळ स्रोतापर्यंत पोहोचण्याची गरज आता निर्माण झाली आहे.

अवैध दारू विकणाऱ्यावर कारवाई झाली, पण ज्या दुकानातून किंवा ज्या माध्यमातून हा माल बाहेर गेला, त्या दुकानदाराची चौकशी होणार का? संबंधित परवानाधारक विक्रेत्याची



भूमिका तपासली जाणार का? अवैध विक्रीसाठी माल पुरविणाऱ्या व्यक्ती आणि वाहतूक करणाऱ्यांवरही महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कारवाई होणार का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

याचबरोबर दारूबंदी विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डोणगाव पोलीस प्रशासन अवैध दारूवर कारवाई करू शकते, मग दारूबंदी विभागाला हे प्रकार दिसत नव्हते का? विभागाकडे याबाबत कोणतीही माहिती नव्हती का? की माहिती असूनही दुर्लक्ष करण्यात आले? अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

डोणगाव पोलीस स्टेशन परिसरातील सर्व परवानाधारक दारू दुकानांच्या विक्री नोंदी, स्टॉक रजिस्टर आणि पुरवठा साखळीची चौकशी होणार का, याकडेही आता लक्ष लागले आहे. कारण अवैध विक्रेत्याकडे पोहोचलेला माल हा हवेतून आलेला नसून त्यामागे पुरवठ्याचे एक जाळे असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

नवीन ठाणेदारांच्या कार्यकाळात अवैध धंद्यांविरोधात कारवाईचा धडाका सुरू झाला आहे, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून ही मोहीम थांबणार, की मूळ पुरवठादार, संबंधित दुकानदार, वाहतूक करणारे आणि संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार, याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

## गणेशोत्सव राज्य महोत्सवांतर्गत मंडळांसाठी कार्यशाळेचे २३ जुलै रोजी आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला महाराष्ट्र शासनाने मागील वर्षीपासून 'राज्य महोत्सवा'चा दर्जा दिला आहे. यावर्षी या राज्य महोत्सवांतर्गत होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धे चा विस्तार देश पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विस्तारामुळे, राज्यासोबतच देशभरात व जगभरात विविध ठिकाणी जी सार्वजनिक मंडळे गणेशोत्सव अत्यंत उत्साहाने व विधायक उपक्रम द्वारे साजरे करतात त्यांना देखील स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. तसेच, त्यांच्या उपक्रमांची दखल शासनातर्फे घेतली जाणार असून, त्यांच्या उपक्रमांना भरघोस बक्षिसांच्या स्वरूपात प्रोत्साहन देखील लाभणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीदिनी म्हणजेच येत्या २३ जुलै रोजी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी प्रशिक्षण कार्यशाळा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी ह्यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर उपस्थित राहणार आहेत.

या वर्षीच्या महागणेशोत्सव उपक्रमांचा शुभारंभाही यानिमित्ताने होणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव विधायक उपक्रमांसह शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी उत्सवांचा इतिहास, उत्सव आणि सामाजिक भान,आर्थिक नियोजन, आपत्ती व्यवस्थापन, विधायक स्वरूपातील कार्यकम संयोजन, नेतृत्व विकास या विषयांवर तज्ञ व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत. तसेच लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वात मुंबईतील ज्या पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली, त्या केशवजी नाईक चाळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून मंडळाच्या शतकोत्तर वाटचालीचा मार्गदर्शनपर आढावा घेण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताने म राठी भाषा, मराठी संस्कृती, विकसित भारताच्या संकल्पनेतील 'वसुधैव कुटुम्बकम' या उक्तीप्रमाणे असणारी वैश्विक कल्याणाची भावना यांचा प्रचार व प्रसार, मूल्याधारित सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रमांना बळकटी इत्यादी साध्य करणे अपेक्षित आहे.

# शिक्षकांच्या मागणीसाठी विद्यार्थी-पालकांचा जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी बहुल भिंगारा व चाळीस टापरी येथील निवासी शाळांमध्ये शिक्षकांची तीव्र कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप करत विद्यार्थी, पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीने सोमवारी बुलढाणा जिल्हा परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

शाळा व्यवस्थापन समितीच्या माहितीनुसार, भिंगारा निवासी शाळेसाठी सहा तर चाळीस टापरी निवासी शाळेसाठी एक अशा एकूण सात शिक्षकांची तातडीने नियुक्ती होणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून आवश्यक संख्येने शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, या प्रमुख मागणीसाठी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने जिल्हा परिषद कार्यालयात दाखल झाले. यावेळी जिल्हा परिषद प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन करण्यात आले.

विद्यार्थिनी देवना खरात यांनी शिक्षकांच्या अभावामुळे नियमित अध्यापन होत नसून शिक्षणाचे मोठे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली. तर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राधेश्याम खरात यांनी शासनाने तातडीने शिक्षकांची नियुक्ती करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

जोपर्यंत शिक्षकांची नियुक्ती होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका शाळा व्यवस्थापन समितीने घेतली असून, प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.